# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 18.06.2025** **वार- बुधवार**

---

**फडणवीस**

संतांनी दिलेला विचार महापालिका आणि राज्य शासनाच्या पुढाकारानं उभारण्यात आलेल्या संतपीठामध्ये चार भाषांमध्ये उपलब्ध असून ते वैश्विक करण्यासाठी संत पीठाचा विद्यापीठापर्यंत विस्तार व्हावा यासाठी प्रयत्न करण्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं पुणे-आळंदी पालखी मार्गावर वडमुखवाडी इथं उभारण्यात आलेल्या संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत नामदेव महाराज भेटीचं समूहशिल्प आणि संतसृष्टीचं लोकार्पण, संतपीठ इथलं प्रेक्षागृह आणि कलादालनाचं लोकार्पण यासह विविध विकास प्रकल्पांचं भूमीपूजन आणि उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी खासदार श्रीरंग बारणे, संतपीठाचे संचालक डॉक्टर सदानंद मोरे, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्र्यांनी मैला शुद्धीकरण पाणी प्रकल्प कार्यान्वित असून शहराला शुद्ध पाणी मिळेल असे नमूद करत नागरिकांचा विरोध लक्षात घेता चऱ्होलीमधील टाऊनशिप आराखडा ताबडतोब रद्द करण्याचे आदेश यावेळी आयुक्तांना दिले.

**पवार**

उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज संस्थान श्री क्षेत्र देहू इथलं श्री विठ्ठल रखुमाई मंदिर आणि श्री संत तुकाराम महाराज शिळा मंदिर आणि श्रीराम मंदिरात दर्शन घेतलं. दर्शनानंतर संस्थानच्या वतीनं पवार यांचा सत्कार करण्यात आला. टाळ-मृदुंगाच्या तालावर भक्तिरसात चिंब झालेले वारकरी, मुखात अखंड तुकोबारायांचा गजर, डोक्यावर तुळशी वृंदावन, हाती दिंड्या-पताका घेतलेले वारकरी अशा भक्तिमय वातावरणात जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज आषाढीवारी पालखीचं आज पंढरपूरकडं प्रस्थान झालं.

**सरकार**

काँग्रेस काळात रोज विविध मंत्र्यांवर भ्रष्टाचार आरोप होत होते, त्यांना राजीनामे द्यावे लागत होते. पण मागील ११ वर्षांत कोणत्याही मंत्र्यावर भ्रष्टाचार आरोप झाले नाही ही महत्वपूर्ण बाब आहे असं मत माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांनी पुण्यात व्यक्त केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारला अकरा वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत ते काल पुण्यात बोलत होते. यावेळी पुणे भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

**महारेरा**

बांधकाम क्षेत्रातील पारदर्शी व्यवहार, ग्राहकांच्या आणि विकासकांच्या हितासाठी 'महारेरा'  प्रयत्नशील असल्यानं बांधकाम क्षेत्राचा विकास आणि जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाला चालना मिळत आहे असं मत महाराष्ट्र स्थावर मालमत्ता नियामक प्राधिकरण अर्थात महारेराचे माजी अध्यक्ष गौतम चॅटर्जी यांनी केलं.

बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियाच्या पुणे सेंटरच्या वतीनं 'बांधकाम क्षेत्राचा विकास आणि स्वयं-पुनर्विकास' यावर आयोजित चर्चासत्रात चॅटर्जी बोलत होते. सुधाकर देशमुख यांनी 'क्यूपीआर' अनुपालन, प्रकल्प विस्तार, दुरुस्ती, कालबाह्यता आणि स्थगित प्रकरणांवरील अद्ययावत माहिती दिली.

**<u>लक्ष्मीबाई</u>**

कऱ्हाडे ब्राह्मण संघ पुणेतर्फे आज पुण्यात राणी लक्ष्मीबाई यांना अभिवादन करण्यात आलं. याप्रसंगी विद्यार्थिनींचं चैतन्यपूर्ण वादन, जयघोष, शंख निनादाने बालगंधर्व रंगमंदिराचा परिसर दुमदुमून गेला. मॉडर्न हायस्कूलमधील 350 विद्यार्थिनी या अभिवादन सोहळ्यात सहभागी झाल्या होत्या. भगवे ध्वज घेऊन विद्यार्थिनींनी जोशपूर्ण घोषणा दिल्या.

**<u>कबड्डी</u>**

१८ वर्षांखालील मुले आणि मुली राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत मुलींच्या गटात पुणे ग्रामीणनं सातारा संघाला ४०-१५ अशा गुणांनी पराभूत करत उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. मुलांच्या गटात मात्र परभणी संघानं पुणे ग्रामीणला ५०-२५ अशा गुणांनी सहज नमविलं.

**<u>ड्रोन</u>**

जगद्गुरु संत तुकाराम महाराज आणि संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या पुणे शहरातील  पालखी सोहळ्यात ड्रोन उडवण्यास पोलिसांनी बंदी घातली आहे. २० ते २३ जून दरम्यान दोन्ही पालख्या पुणे मुक्कामी असतील. केवळ सरकारी आणि पोलिसांची परवानगी असलेल्या ड्रोन चालकांना ड्रोन उडवण्यास परवानगी दिली जाईल.

**<u>माजीसैनिक</u>**

आपत्कालीन परिस्थितीत नागरी संरक्षण दल बळकट करण्यासाठी पुणे जिल्ह्यातील लष्कर, नौदल आणि वायु दलामधून सेवानिवृत्त झालेल्या माजी सैनिकांना नागरी संरक्षक दलामध्ये स्वयंसेवक म्हणून नोंदणी करण्याचं आवाहन करण्यात येत आहे. इच्छुकांनी पुणे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात संपर्क साधावा, असं आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी निवृत्त लेफ्टनंट कर्नल हंगे  यांनी केलं आहे.

पुणे आणि परिसरात आकाश ढगाळ राहून पावसाच्या हलक्या ते मध्यम सरी अधूनमधून पडत आहेत. मधेच सूर्यदर्शनही होत आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**